महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दिनांक.२९/०१/२०२६

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक-शानिवा-१०२५/ प्र.क्र.६७८/ पोल-७(E: १३७३५९९), दि.३०/०१/२०२६

**विषय**:- मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जपुती-२०२६/ प्र.क्र.१२/कार्या-जपुक (२९),दि.२९/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१३०१७१०५०९५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-02-2026 16:13:22

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः शानिवा-१०२५/प्र.क्र. ६७८/ पोल-७ (E: १३७३५९९)**

दुसरा मजला, मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ३० जानेवारी, २०२६

**वाचा -**

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांकः शानिवा-१०२५/प्र.क्र. ६७८/पोल-७ (E:१३७३५९९), दिनांक १० ऑक्टोबर, २०२५
२) उच्च स्तरीय समितीची बैठक दिनांकः १४ नोव्हेंबर, २०२५
३) मा. मंत्रीमंडळाची बैठक दिनांकः १७ जानेवारी, २०२६

**प्रस्तावना -**

मुंबई पोलीस दलाची संरचना हि ब्रिटिश कालखंडापासून अस्तित्वात असून मुंबई पोलिसांना अभिमानास्पद इतिहास व दीर्घकालीन परंपरा लाभलेली आहे. मुंबई पोलिसांचा इतिहास हा मुंबई शहराच्या प्रगतीशी जोडलेला असून, सन १८५६ मध्ये स्थापन झालेले पोलीस आयुक्तालय आज देशातील सर्वोत्कृष्ट व आधुनिक पोलीस दलांपैकी एक आहे. मुंबई हे आंतराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध शहर असून येथे लाखो विदेशी पर्यटक, व्यापारी, उद्योगपती तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सतत मुंबईमध्ये येत असतात. त्यामुळे मुंबई पोलिसांना सुरक्षेच्या जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात पार पाडाव्या लागतात. मुंबई पोलीस दल हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद व आदर्श पोलीस दल म्हणून महत्वपूर्ण कार्य करीत आहे.

मुंबई शहरातील लोकसंख्या वाढ व बदलत्या परिस्थितीनुसार मुंबई पोलीस दलाच्या संख्येत टप्याटप्प्याने वाढ करण्यात आली आहे. सद्यस्थितीत ९४ पोलीस ठाणे, ५ सशस्त्र पोलीस दल व इतर विशेष शाखांची निर्मिती करण्यात आली असून सध्या ५१,३०८ एवढे मनुष्यबळ मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे.

शासन निर्णय क्रमांक: आरएसए-०११६/प्र.क्र. २३/पोल-७, दिनांक ०१/१२/२०१६ नुसार मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई ते पोलीस उप निरीक्षक यांच्याकरिता ४५.०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या निवासस्थानाची तसेच पोलीस अधिकारी यांच्यासाठी ६०/८०/१२० चौरस मीटर क्षेत्रफळ किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या निवासस्थानाची अनुज्ञेयता निश्चित करण्यात आली आहे. संपूर्ण मुंबई शहरामध्ये पोलीस अंमलदारासाठी ४५.०० चौरस मीटर क्षेत्रफळाची फक्त

१६०१ इतकीच सेवानिवासस्थाने उपलब्ध असून, त्यापेक्षा मोठ्या क्षेत्रफळाची १२०३ इतकी सेवानिवासस्थाने उपलब्ध आहेत. मुंबई पोलीस दलाकडे उपलब्ध निवासस्थानांपैकी १६,९५८ निवासस्थाने १०० ते ३०० चौरस फूट क्षेत्रफळाची असून, सदर सेवानिवासस्थाने ब्रिटिश कालीन जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींमध्ये आहेत. सध्याच्या आधुनिक काळात पोलीस कुटुंबियांना अशा अनेक प्रकारच्या समस्यांना व त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मुंबई शहरातील लोकसंख्या व वाढत्या जबाबदाऱ्यांमुळे मुंबई पोलीस दलाच्या निवासस्थानाची टंचाई अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. सध्या १९,७६२ इतक्या कमी प्रमाणात उपलब्ध असलेल्या पोलीस निवासस्थानांमुळे अनेक अधिकारी व अंमलदार यांना मुख्यालयापासून वा आपल्या कर्तव्याच्या कार्यालयापासून दूरवर राहावे लागते. मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विरार, पालघर, कल्याण, कर्जत, कसारा व पनवेल अशा दूरच्या ठिकाणी वास्तव्य करावे लागत असून त्यामुळे पोलीस दलातील महत्वाचे दैनंदिन कामकाज करण्यास व कर्तव्यावर हजर होण्यास त्यांना विलंब होतो. मुंबई पोलीस दलातील सुमारे ५० टक्के पोलीस मनुष्यबळ हे लांबच्या ठिकाणावरून अंदाजे ८० ते १०० किमी.चा प्रवास करुन आपले कर्तव्य बजावत आहेत. हे पोलीस दलाच्या कार्यक्षमतेस व मनोबलास बाधा आणणारे ठरत आहे.

मुंबई शहर हे देशाचे मुख्य आर्थिक व औद्योगिक केंद्र असल्याने पोलीस यंत्रणेला मुंबई शहरात विविध आव्हांनाना सामोरे जावे लागते. मुंबईत नैसर्गिक आपत्ती, दहशतवादी हल्ले यासारख्या घटनांचा धोका कायम असतो. शिवाय मुंबई हे विविध जाती, धर्म समुदायांचे मिश्रण असलेले शहर असल्यामुळे येथे विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. अशा सर्व कार्यक्रमांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी मुंबई पोलिसांवर असते. त्यामुळे पोलीस दलाच्या निवासस्थानाच्या उपलब्धतेचे प्रमाण वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षिततेच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन मुंबई पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीता सेवा निवासस्थाने निर्माण करण्यासाठी मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी “अपर मुख्य सचिव, गृह” यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक शानिवा- १०२५/ प्र.क्र. ६७८/ पोल-७ (E-१३७३५९९), दिनांक १०/१०/२०२५ अन्वये उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी बैठक पार पडली होती. या बैठकीमधे उच्च स्तरीय समितीने सदर प्रकल्पाचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या समोर आणण्याची शिफारस केली आहे.

मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षेच्या जबाबदाऱ्या लक्षात घेता, मुंबई पोलीस दलासाठी निवासस्थानांची संख्या वाढवून पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करून पोलीस

अधिकारी / अंमलदार यांच्यासाठी सुसज्ज व अद्ययावत वसाहती/ निवासस्थाने निर्माण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन, तसेच पोलीस दल अधिक कार्यक्षमतेने व जलद प्रतिसाद देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पार पाडू शकेल, या करिता दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मुंबई मध्ये पोलीसांकरता 'Police Housing Township Project' ची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. या मान्यतेस अनुसरून, मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी, या प्रकल्पाचा नियोजनबध्द आराखडा तयार करण्यासाठी तसेच या प्रकल्पासाठी राज्य स्तरावरुन आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी "मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प" अंमलबजावणीचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षेच्या जबाबदाऱ्या लक्षात घेता, मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी सुसज्ज व अद्ययावत अशी सुमारे ४०,००० ते ४५,००० शासकीय सेवा-निवासस्थाने बांधण्याच्या अनुषंगाने "मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प" (Mumbai Police Housing Township Project) राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे :-**

१) **प्रकल्पाचे विकसन क्षेत्रफळ व अंदाजित किंमत :**
मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पांतर्गत विकसन करावयाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५ कोटी चौरस फूट इतके असून, विकसन प्रकल्पाची अंदाजे किंमत रुपये २०,००० कोटी (अक्षरी रुपये वीस हजार कोटी मात्र) इतकी आहे.

२) **प्रकल्पाकरिता कार्यान्वयीन यंत्रणा (Nodal Agency) :**
मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेल्या "महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्यादित" (Maharashtra State Infrastructure Development Corporation Limited-MSIDC) या राज्य शासनाच्या अंगीकृत संस्थेस कार्यान्वयीन यंत्रणा (Nodal Agency) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३) **प्रकल्पाचा तांत्रिक व सुसाध्यता अहवाल :**
मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत खालील बाबींच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात येईल :-

(१) मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल (Detailed Techno-Economic Feasibility Report) तयार करणे.

(२) प्रकल्पाकरिता वास्तुशास्त्रज्ञाची (Architect) निवड करणे.

(३) प्रकल्पाकरिता निविदा प्रक्रिया (Bid Tender Process) राबवविणे.

(४) प्रकल्पाकरिता सल्लागारांची (Consultant) नियुक्ती करणे.

(५) प्रकल्पाचा आर्थिक सुसाध्यता अहवाल ३ महिन्यांच्या आत शासनास सादर करणे.

४) **प्रकल्पाचे आर्थिक नियोजन व प्रकल्पाकरिता निधी उभारणी :-**

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या अंदाजित रुपये २०,००० कोटी एकूण निधीपैकी रक्कम रुपये ६,००० कोटी (३० टक्के) शासन सहभागातून व उर्वरीत रक्कम रुपये १४,००० कोटी (७० टक्के) निधी शासन हमीद्वारे वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरूपात उभारण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळास प्राथमिक निधी म्हणून रुपये १०० कोटी निधी गृह विभागाच्या नियतव्ययामधून उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | निधीचा स्त्रोत | अंदाजे रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत | २०,००० कोटी | १०० टक्के |
| २ | शासन सहभाग | ६००० कोटी | ३० टक्के |
| ३ | शासन हमीद्वारे वित्तीय संस्थांकडून कर्ज - MSIDC द्वारे उभारणी | १४,००० कोटी | ७० टक्के |
| ४ | प्राथमिक निधी (Seed Money) | १०० कोटी | -- |

शासन सहभागाद्वारे देण्यात येणारा निधी गृह विभागाच्या अनुज्ञेय लेखाशीर्षामधून उपलब्ध करून देण्यात येईल. निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५) **भूखंडांचे निश्चलीकरण** (Land Monetization) **:**

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पांतर्गत शासन हमीद्वारे उभारल्या जाणाऱ्या कर्जाची व व्याजाची परतफेड करण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या व प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणाऱ्या जागेचे व्यापारीकरण/ खाजगीकरणाच्या माध्यमातून भूखंडांचे निश्चलीकरण करण्यात येईल. या बाबींसाठी व्यवहार सल्लागार (Transaction Advisor) यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. तसेच, वित्तीय संस्थांकडून कर्ज

उभारणी व भूखंडांचे निश्चलीकरण प्रक्रिया देखील महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत राबविण्यात येईल.

६) **प्रकल्पाकरिता प्राथमिक निधी (Seed Money) :**

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी, तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु करण्यासाठी रुपये १०० कोटी (अक्षरी रुपये शंभर कोटी मात्र) इतका प्राथमिक निधी महामंडळास सुपूर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७) **भूखंडांचे हस्तांतरण :**

या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या भूखंडांची मालकी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या नावे हस्तांतरित करण्यात येईल. सदर हस्तांतरण करताना त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध निर्माण होणार नाहीत, तसेच उक्त मिळकतीच्या प्रयोजनात बदल होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

८) **प्रकल्पाची प्रगती आणि प्रकल्पाची देखरेख व समन्वय :**

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या प्रगतीवर व अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी आणि समन्वय साधण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये गठीत उच्च स्तरीय समिती कार्यरत राहील. सदर प्रकल्पाच्या प्रगतीची व अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी या समितीची राहील.

९) **प्रकल्प अंमलबजावणीच्या इतर अटी व शर्ती :**

मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल :-

(१) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या तरतुदींचे पालन करण्यात येईल.

(२) मुंबई मधील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्रफळापेक्षा कमी चटई क्षेत्रफळाचे निवासस्थान बांधण्यास अनुमती असणार नाही.

(३) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने प्राथमिक निधी प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांच्या आता तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल गृह विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

(४) प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्याची प्रगती उच्च स्तरीय समितीसमोर सादर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची राहील.

(५) प्रकल्पांतर्गत प्रत्यक्ष निधीचे वितरण व खर्चाचे नियंत्रण महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत करण्यात येईल.

(६) प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान सर्व वैधानिक परवानग्या व मंजुऱ्या विहित कार्यपद्धतीनुसार प्राप्त करून घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची राहील.

(७) प्रकल्पांतर्गत कर्ज उभारणी व परतफेडीबाबत महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने गृह विभाग तसेच वित्त विभागाशी नियमित समन्वय ठेवणे आवश्यक राहील.

(८) प्रकल्पाचे वार्षिक लेखापरीक्षण करण्यात येईल व त्याचा अहवाल शासनास तसेच उच्च स्तरीय समितीसमोर सादर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची राहील.

(९) प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता राखण्याची व सर्व निविदा प्रक्रिया शासनाच्या प्रचलित नियमांनुसार पार पाडण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१३०१७१०५०९५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

IQBAL SINGH CHAHAL

Digitally signed by IQBAL SINGH CHAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=4693065dc6b0f1adab446e59c0657dc1f7d32e83285bc2f58ce129f739c3ce3c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=234E13A0023CA3F6CD51E31FF2129CB01762B1F6247B20869561B939AE2AEF51, cn=IQBAL SINGH CHAHAL
Date: 2026.01.30 17:11:56 +05'30'

**(डॉ. इक्बाल सिंग चहल)**
**अपर मुख्य सचिव, गृह**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे अपार मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सन्माननीय संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
१०. सर्व सन्माननीय मंत्री/ राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व सन्मानीय विधानसभा, विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१३. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई.
१६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
१८. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई.
२०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
२१. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
२२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
२३. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२६. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
२७. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२८. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
२९. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
३०. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
३१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३२. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ प्रादेशिक प्रमुख/ कार्यालय प्रमुख.
३३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती).

३४. अध्यक्ष, इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

३५. अध्यक्ष, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई.

३६. अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ.बॅरेक नं. १, योगक्षेमसमोर, वसंतराव भगवान चौक, नरिमन पॉईंट, मुंबई.

३७. अध्यक्ष, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई.

३८. अध्यक्ष, भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई.

३९. अध्यक्ष, राष्ट्रीय जनता दल (से.), एल. आय. सी. इमारतीसमोर, मुंबई.

४०. अध्यक्ष, बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई.

४१. अध्यक्ष, शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई.

४२. अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, २०२, मातोश्री टॉवर, दुसरा मजला, पद्माबाई ठक्कर मार्ग, माटुंगा (प.), मुंबई.

४३. निवडनस्ती, (कार्यासन पोल-७).